## दिनांक 24/03/2025

**1.** खोपोली पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 22/03/2025 रोजी 19:45 वा ते दि. 23/03/2025 रोजी 19:45 वा च्या दरम्यान मौजे नवघर-शेणगांव, खोपोली, येथे आरोपीत रा.नवघर-शेणगांव, खोपोली यांचे राहत्याघरात ता.खालापुर येथे आरोपीत त्याचे याचे ताब्यात एकुण 19,100/- रु.किमतीच्या 08 तलवारी व 02 खंजीर असे विनापरवाना बेकायदा बाळगले स्थितीत मिळुन आला.

याबाबत खोपोली पोलीस ठाणे गुरनं.88/2025, शस्त्र अधिनियम, 1959 चे कलम 4,25 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई श्री अभिजित व्हारांबले हे करीत आहेत.

**2.** मांडवा (सागरी) पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 22/03/2025 रोजी 10:00 वा च्या सुमारास मौजे धोकवडे हनुमान मंदीरासमोर ता. अलिबाग येथे धोकवडे गावात हनुमान मंदीरात उत्सवाबाबत मिटींग संपल्यानंतर बाहेर निघताना रोडजवळ मंदिराच्या पत्रा शेडमध्ये गाडी पार्किंग करण्याचे जुना राग काढुन आरोपीत नं 1,2,3,4 रा. धोकवडे ता. अलिबाग यांने फिर्यादी यांना बाचाबाची व शिविगाळी करून फिर्यादी यांचे अंगावर धावुन आले त्यापैकी आरोपीत नं 2, आरोपी नं. 3 यांनी त्यांचे हातातील लोखंडी कडयासारखे वस्तुने फिर्यादी यांचे डोक्यावर फाईट मारून डोक फोडुन दुखापत केली.

याबाबत मांडवा (सागरी) पोलीस ठाणे गुरनं. 39/2025, महाराष्ट्र नरबळी व इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समूळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम, २०१३ , भारतीय न्याय दंड संहिता 2023 118(1),352, 3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/श्री. प्रदीप देशमुख हे करीत आहेत.

**3.** दिघी (सागरी) पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 21/03/2025 रोजी 20:30 वा ते दि. 22/03/2025 रोजी 20:30 वा च्या दरम्यान आरोपीत याने महिला फीर्यादी पिडीत ही तिचे काकाचे घरी रस्त्याने एकटी जात असताना तीस ओढत ओढत त्याचे राहते घरात नेवुन तीस घरात कोंडुन तीचे सोबत जबदस्तीने इच्छेविरूध्द वांरवार जबस्तीने शारिरीक संबध केले.

याबाबत दिघी (सागरी) पोलीस ठाणे गुरनं.20/2025, बी एन एस 2023 चे कलम 64(1) 64(2)(M),128(b),352 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सपोनि श्री

हनुमान शिंदे हे करीत आहेत.

**4.** खालापूर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 20/03/2025 रोजी 00:00 वा च्या सुमारास मौजे कलोते मोकाशी येथील बोहो फार्महाउसमध्ये ता. खालापुर येथे अज्ञात चोरटयाने फिर्यादी रा.समर्थनगर सोसायटी रुम नं.10 तिसरा मजला बिडींग नं.4/बी मोगल,यांचे फार्महाउस मध्ये बसवलेला 200 केव्हीचा नवीन विदयुत ट्रान्सफार्मर (डिपी) तोडुन त्यामधील 430 लीटर ऑईल जमिनीवर सांडुन नुकसान करुन विदयुत ट्रान्सफार्मरचे फोडुन नुकसान करुन ट्रान्सफार्मर मधील एकुन 46,000/- रुपये व किंमतीची कॉपर (तांबे) कॉईल काढुन घेवुन चोरुन नेले.

याबाबत खालापूर पोलीस ठाणे गुरनं.102/2025, भा.न्या.सं.2023 चे 303(2),324(4) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/शेखर मोरे हे करीत आहेत.

## वाहतूक केसेस

दिनांक 23.03.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 400 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून 4,41,600/-रुपये इतका दंड आकारला आहे.